महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४० वा | दिनांक : २५/०२/२०२५ | वार : मंगळवार

## संजय राऊत ही महाराष्ट्राच्या वैचारिकतेला लागलेली कीड, चित्रा वाघ



**पुणे** : शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. दोन मर्सडिज दिल्या की एक पद मिळते, असे त्यांनी विधान केले होते. यावर खासदार संजय राऊत यांनी टीका केली होती. संजय राऊत यांनी केलेल्या टीकेवर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊत ही महाराष्ट्राच्या वैचारिकतेला लागलेली कीड आहे, अशी टीका चित्रा वाघ यांनी केली आहे.

चित्रा वाघ म्हणाल्या, संवैधानिक पदावर असणाऱ्या नीलम ताई गोऱ्हे यांच्याबद्दल इतक्या घाणेरड्या भाषेत हे संजय राऊत बोलतात. ही महाराष्ट्राच्या वैचारिकतेला लागलेली कीड असल्याचे चित्रा वाघ म्हणाल्या. महिलांबद्दल अतिशय वाईट बोलणे त्यांना अश्लील शिव्या देणे हा संजय राऊतांचा इतिहास आहे. त्यांनी स्वप्ना पाटकर यांना दिलेल्या अश्लील शिवीगाळची क्लीप आज ही समाजमाध्यमांवर उपलब्ध आहे. अशा नाठाळ संजय राऊतांना आता महाराष्ट्रातील महिलांनीच वठणीवर आणले पाहिजे, असे चित्रा वाघ म्हणाल्या.

शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या वादग्रस्त विधानावर संजय राऊत यांनी टीका केली होती. संजय राऊत यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर 'निर्लज्ज, नमकहराम' असे शब्द वापरत टीका केली होती. ज्या घरात तुम्ही खाल्ले, आमदार झालात त्या विरोधात आज बोलतात, असेही संजय राऊत म्हणाले.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, मला आठवत आहे बाळासाहेब ठाकरे बोलले होते ही बाई कोण आणली. काही लोकांच्या मर्जी खातीर त्या आल्या, गेल्या चार वेळा आमदार झाल्या आणि जाताना ताटामध्ये घाण करून गेल्या. त्या बाईंचे कर्तृत्व काय? विधान परिषदेत हे जर समजून घ्यायचे असेल तर पुण्यात महानगरपालिकेत आमचे गटनेते होते अशोक हरनाळ त्यांची मुलाखत घ्या. त्यांच्याकडून धमक्या देऊन हे जेव्हा पुण्याचा प्लानिंग डीपी सुरू होते तेव्हा कोणा कोणाच्या नावावर या बाईने कोट्यावधी रुपये गोळा केले? हे गटनेते अशोक हरनाळ यांची मुलाखत घ्या, मग हे मर्सडीज प्रकरण काय आहे ते त्यांना कळेल.

## नीलम गोऱ्हे यांचे वक्तव्य मूर्खपणाचे : शरद पवार



**मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कार्यक्रम वेगळ्या ठिकाणी होता. तर संमेलनातील इतर कार्यक्रम हे तालकोट मैदानावर झाले. साहित्य संमेलन यशस्वी झाले असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही, असे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे. तसेच संजय राऊत यांनी केलेल्या विधानाचे शरद पवार यांनी समर्थन केले आहे. संजय राऊत जे बोलले ते शंभर टक्के बरोबर, असे शरद पवार म्हणाले आहेत.

नीलम गोऱ्हे यांच्यावर बोलताना शरद पवार म्हणाले, नीलम गोऱ्हे यांना चार टर्म कशी मिळाली हे सर्वांना माहीत आहे. तसेच नीलम गोऱ्हे यांना असे भाष्य करण्याची गरज नव्हती. नीलम गोऱ्हे यांचे वक्तव्य मूर्खपणाचे होते. तसेच त्यांनी ते भाष्य केले नसते तर बरे झाले असते. संजय राऊत जे म्हणतात ते योग्य आहे.

संजय राऊत यांनी नीलम गोऱ्हे यांच्या वादग्रस्त विधानानंतर नाराजी व्यक्त करत अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाला पत्र पाठवले होते. संजय राऊत यांनी आयोजकांवर जाहीर नापसंती व्यक्त केली होती. त्यानंतर साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी माफी मागितली असल्याची माहिती शरद पवार यांनी दिली आहे.

पुढे बोलताना शरद पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर भाष्य केले आहे. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना शरद पवार म्हणाले, नैतिकता आणि या लोकांचा काही संबंध असेल असे मला वाटत नाही. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले मी त्या गावात जाऊन आलो आहे. त्या गावातील लोकांच्या भावना मी समजू शकतो. कोणालाही स्वाभिमान असेल अशी व्यक्ती त्या पदावर अजिबात राहणार नाही. पण संबंध राज्यातून लोकांचा हल्ला होत आहे तरी सुद्धा सत्तेवर आपण बसून राहायचे ही जी भूमिका घेऊन हे लोक वागत आहेत.

## साहित्य संमेलनातील वक्तव्यांवरून फडणवीसांचे खडे बोल

**मुंबई** : दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून काही राजकीय वक्तव्ये देखील समोर आली आहेत. या सर्व व्यक्तव्याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खडे बोल सुनावलेत. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर बोलताना प्रत्येकाने मर्यादा ठेवायला हव्यात, असा सल्ला फडणवीस यांनी दिला.

इतकेच नाही तर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात सुरू झालेल्या सुसंवादाचे देखील त्यांनी स्वागत केले. मात्र, ते करत असतानाच सकाळच्या भोंग्याला देखील माध्यमांनी सुसंवाद शिकवायला हवा, असा टोला त्यांनी संजय राऊत यांना लगावला.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एका कार्यक्रमात एकत्र आले होते त्यांच्यामध्ये सुसंवाद झाला. राज्यात कोणीही कोणाशी सुसंवाद साधत असेल तर त्याचे स्वागतच आहे. राज्यात कोणीही विसंवाद करू नये. सुसंवाद असायलाच हवा, यात कोणाचेही दुमत असायचे कारण नाही. तसेच आपणही सर्वांनी मिळून सकाळी नऊ वाजेच्या भोंग्याला देखील सुसंवाद कसा करायचा हे शिकवले तर राज्यातील संवादाची परिस्थिती चांगली होईल, असा टोला त्यांनी संजय राऊत यांना लगावला आहे. ज्याप्रमाणे ५० टक्के दोषी हे सकाळचा भोंगा वाजवणारे आहेत त्याचप्रमाणे माध्यमे देखील त्याला ५० टक्के दोषी असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

प्रत्येकाने साहित्य संमेलनात बोलताना त्या ठिकाणी काही मर्यादा ठेवायला हव्यात. विशेषतः जे साहित्यिक आहेत, त्या साहित्यिकांनी देखील वारंवार असे वाटते की, राजकारण्यांनी आमच्या व्यासपीठावर येऊच नये. किंवा तशा प्रकारचे त्यांचे नेहमी वक्तव्य असते. अशावेळी साहित्यिक यांनी देखील पार्टी लाइनवरच्या कमेंट करणे योग्य नाही. त्यांनीही मर्यादा पाळायला पाहिजे, असे माझे मत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. नीलम गोऱ्हे या उद्धव ठाकरे यांच्या पक्षात होत्या. मी त्या पक्षात नव्हतो. त्यामुळे त्या पक्षात काय चालायचे हे त्याच सांगू शकतात. मी त्यावर कमेंट करू शकत नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५

# मराठी बोलींचे अभ्यासक, लेखक डॉ. रमेश सूर्यवंशी यांचा सत्कार



**कन्नड (अरुण थोरात):** महाराष्ट्र शासनाच्या भाषा विभागाकडून दिला जाणारा, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जेष्ठ भाषा वैज्ञानिक आणि साहित्य समीक्षक डॉक्टर अशोक केळकर यांच्या नावाने देण्यात येणारा अशोक केळकर मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार २०२४ , कन्नड येथील बोलीभाषा अभ्यासक,लेखक, साहित्यिक, समीक्षक डॉ. रमेश सूर्यवंशी यांना जाहीर झाला आहे.

त्याबद्दल शिवजयंतीचे औचित्य साधून कन्नड येथील जयकाली सांस्कृतिक मंडळाच्या वतीने त्यांचा पत्नी सौ मीना सूर्यवंशी यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत पवार आणि प्राचार्य अनिता पवार यांनी सत्कार केला यावेळी रवींद्रनाथ टागोर विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र नीळ हेही उपस्थित होते.

यावेळी सुरुवातीला संपूर्ण विश्वाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्यानंतर बोलताना डॉ. सूर्यवंशी म्हणाले की , परिस्थितीला दोष देऊ नका, चांगल्या गोष्टीचा शोध घ्या, संकटाला तोंड द्या, योग्यवेळी मार्ग सापडेल. सदरील पुरस्कार २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया या ठिकाणी प्रदान करण्यात येणार आहे .

सदरील पुरस्काराचे स्वरूप दोन लाख रुपये रोख , मानपत्र, आणि सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे.या पुरस्कारासाठी त्यांनी केलेल्या अहिराणी भाषेचा भाषा वैज्ञानिक अभ्यास, शब्दकोश, म्हणी वाक्प्रचार, सुलभ व्याकरण, खानदेशातील कृषक जीवन इत्यादी ग्रंथ संपदे सोबतच अहिराणी, गोंडी, परदेशी, आदिवासी, भिल्ल, ठाकर, मेळघाटातील गवळी यांच्या बोलीभाषेवर केलेले संशोधन प्रभावी ठरले आहे. सदरील कार्यक्रमाचे संचलन कल्याणी मुळे हिने केले तर आभार रविता जाधव हिने मानले.

## महात्मा गांधी विद्यालय, रावणकोळा येथे नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा



**मुरुम (सुधीर पंचगल्ले) :** जळकोट तालुक्यातील रावणकोळा येथील महात्मा गांधी विद्यालय, रावणकोळा व संदीप वाघमारे यांच्या वतीने गावातील विविध क्षेत्रांत निवड झालेल्या नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

सन्मानाचा सोहळा – मान्यवरांची उपस्थितीअध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष संग्रामजी वाघमारे, प्रमुख पाहुणे तहसीलदार राजेशजी लांडगे, गटविकास अधिकारी नरेंद्रजी मेडेवार व अरुणाताई सूर्यवंशी, सरपंच सत्यवान दळवे पाटील, भाजप तालुका अध्यक्ष सत्यवानजी पांडे, माजी सरपंच मंगेशजी हुंडेकर, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष धनराज दळवे, विद्यालयाचे मुख्याध्यापक सोरगेकर एस.एम., मनोज जाधव व कृष्णराज वाघमारे उपस्थित होते.

नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा जाहीर सत्कारगावातील प्रतिष्ठित नागरिक, आजी-माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा त्यांच्या पालकांसह जाहीर सन्मान करण्यात आला. सन्मानित व्यक्ती – रमिज सय्यद, लिपिक यशवंत सूर्यवंशी एस आर पी एफ, ऋषिकेश वाघमारे मुंबई पोलीस, राम वाघमारे आरोग्य सहाय्यक, सूर्यकला वाघमारे मुंबई पोलीस, सूर्यकांत वाघमारे राज्य परिवहन महामंडळ चालक, माजी विद्यार्थी व माजी कर्मचारी यांचा पण यावेळी सत्कार करण्यात आला प्रवीण वाघमारे महावितरण, उद्धव वाघमारे राज्य परिवहन महामंडळ, शिवराज जमदरे सहशिक्षक जिल्हा परिषद, संघर्ष, जिद्द आणि यशाच्या कथानवनियुक्त कर्मचाऱ्यांनी संघर्ष व यशाच्या आठवणी सांगून तरुणांना कठोर परिश्रम, सातत्य व जिद्दीचे महत्त्व पटवले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना यशस्वी भविष्यासाठी प्रेरणादायी विचार मांडले.

विद्यालयाच्या उपक्रमाचे कौतुककार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन व्ही.आर. सूर्यवंशी यांनी केले व शंकरा डिजिटल फोटो स्टुडिओ यांनी सुंदर असा छायाचित्र केले. या भव्य सत्कार सोहळ्यामुळे रावणकोळा नगरीतील तरुणांना नवी प्रेरणा मिळाली, तसेच विद्यालयाच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यशाचा नवा प्रवास – नव्या ऊर्जा, नव्या दिशाहा सोहळा केवळ सन्मानापुरता मर्यादित न राहता, तरुणांना मोठी स्वप्ने पाहण्यास आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रेरित करणारा ठरला. संघर्ष, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सामान्य परिस्थितीतील विद्यार्थीही उच्च पदांवर पोहोचू शकतात, याचा प्रत्यय उपस्थितांना या सोहळ्यातून आला.रावणकोळा नगरीतील युवकांमध्ये नव्या ऊर्जेचा संचार झाला असून, हा सत्कार सोहळा यशस्वी भविष्यासाठी नव्या दिशेची वाट दाखवणारा ठरला.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५


## देवगिरी किल्ला परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या वतीने राज्यमंत्रीच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** अजिक्य किल्ला देवगिरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जनस्वराज्य यात्रा या निमित्ताने गड किल्ले संवर्धन स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे युवक जिल्हाध्यक्ष अनुराग शिंदे यांनी दौलताबाद परिसरात पार्टी च्या वतीने स्वच्छता मोहिमेची जबाबदारी स्वीकारत सदर कार्यक्रम यशस्वी केला.

यावेळी आज त्या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती असलेले महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम तथा जलसंधारण मंत्री राज्यमंत्री इंद्रनील नाईक व तसेच राष्ट्रवादी व काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुरेश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज स्वराज्य सप्ताह देवगिरी किल्ल्यावरती संपन्न झाला.

त्यावेळी आमदार विक्रमजी काळे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार कैलास पाटील विद्यार्थी राष्ट्रवादी व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम,प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड महिला जिल्हाध्यक्ष स्वाती कोल्हे मराठवाडा युवक अध्यक्ष दत्ता भांगे युवकचे शहराध्यक्ष मयूर सोनवणे मराठवाडा युवती अध्यक्ष अंकिता विधाते तसेच प्रदेश सचिव अमर पाटील, सौरभ मगरे, शिल्पा भोसले, रवींद्र माहुरकर, बाळासाहेब सावंत, विशाल शेळके, योग पैठण तालुकाध्यक्ष भाऊसाहेब तळमळे, कन्नड नगराध्यक्ष संतोष कोल्हे, तालुका अध्यक्ष वैभव चव्हाण, शहराध्यक्ष सुनील कुदळे, तालुकाध्यक्ष राजू पठाण, तालुकाध्यक्ष शिवप्रसाद डमाळे, शहराध्यक्ष साईनाथ खरे, सिल्लोड तालुकाध्यक्ष अक्षय पाटील, तालुका कार्याध्यक्ष दिनकर हरदे, जिल्हा सचिव मनिषद तालुका अध्यक्ष नितीन रोकडे सोशल मीडिया अध्यक्ष ओम विखे सोशल मीडिया तालुकाध्यक्ष परवेज शेख तालुका कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण विधानसभा अध्यक्ष शुभम वाघ आदी पदाधिकारी व महिला युवती युवक प्रदेश पदाधिकारी संत कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजीवनी गिल्डा व स्नेहा माळी यांची उत्कर्ष साठी निवड





**लोहारा :** २३ ते २५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे उत्कर्ष या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केले आहे.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील सोळा विद्यापीठातून ३२० रासेयोचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

सदर स्पर्धेसाठी भानुदासराव चव्हाण महाविद्यालय ,लोहारा येथील संजीवनी गिल्डा व स्नेहा माळी या दोन स्वयंसेवकांची निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल म.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष मा. प्रकाशदादा सोळंके, सचिव मा.आ. सतीशभाऊ चव्हाण, म. वि.समितीचे अध्यक्ष प्रा.सतीशदादा इंगळे, प्राचार्य डॉ.रामदास ढोकळे, प्रा स्वाती निकम कार्यक्रमाधिकारी डॉ. महानंदा मोरे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## जालन्यातील जेईएस महाविद्यालयात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल 'जागर ज्ञानेश्वरीचा' कार्यक्रमाचे आयोजन



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** :मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल या वर्षापासून दि. २७ फेब्रुवारी रोजी, मराठी भाषा गौरव दिन व कुसुमाग्रजांच्या जयंतीनिमित 'जागर ज्ञानेश्वरीचा' हा कार्यक्रम दर गुरुवारी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा अभिनव उपक्रम, वर्षभर ५२ आठवडे हा कार्यक्रम अखंडपणे सुरू राहणार असून, यामध्ये ज्ञानेश्वरी च्या एकूण १८ अध्यायांचे वाचन-प्रवचन होणार आहे. दर गुरुवारी ज्ञानेश्वरीतील ओवींवर मराठीतून प्रवचन होणार आहे.या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार असून, मराठी विभागाचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.

## संजय शिरसाट हे स्वत: गुत्तेदारी करतात : अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. दोन मर्सिडिज दिल्या की एक पद मिळते, असे विधान नीलम गोऱ्हे यांनी केले होते. यावरून ठाकरे गट आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच यावर आता शिंदे गटाच्या नेत्यांनी देखील प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे.

शिवसेना ठाकरे गट व शिवसेना शिंदे गटात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून संजय शिरसाट यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. संजय शिरसाट म्हणाले, संजय राऊत यांच्याकडील गाड्या कोणाच्या नावावर आहेत, ते त्यांनी सांगावे. जास्त बोलायला लाऊ नका, झाकली मूठ सव्वालाखाची ठेवा. कोणी कोणी गाड्या दिल्या, कोणी काय काय दिले हे जर एक एक जण बोलायला लागले तर दिवस पुरणार नाही, अशी टीका संजय शिरसाट यांनी केली आहे. याला ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

अंबादास दानवे संजय शिरसाट यांना प्रत्युत्तर देताना म्हणाले, संजय शिरसाट हे स्वतः गुत्तेदारी करतात, ते मुंबईतील ७२ व्या मजल्यावर राहतात. छत्रपती संभाजीनगरमध्ये २२ हजार स्क्वेअर फुटाचा बंगला त्यांनी कसा मिळवला याचं उत्तर द्यावे. माझ्या घरासमोर असलेल्या गाड्या या माझ्याच नावावर आहेत, तुमच्या घराच्या मागे असलेले जेसीबी, कोट्यवधी किमतीच्या गाड्या या कशा कमावल्या याचे उत्तर त्यांनी द्यावे. माझ्या नादाला लागू नका नाहीतर सगळेच बाहेर काढेन, असा इशारा अंबादास दानवे यांनी दिला.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, निलमताईंना चार वेळा आमदार केले. दोन वेळा त्यांना उपसभापती केले आणि इतर दोन पदेही दिली. त्यामुळे त्यांनी १२ मर्सिडिज दिल्या का? त्या महिला आहेत म्हणून शब्द वापरता येत नाहीत पण नमक हरामीपणा केला जातोय. इतर महिलांना संधी न देता निलम ताईंना संधी दिल्या. तुम्ही गद्दारी केली तर केली. आता आहे तिथे नीट राहा ना. औकात नसणाऱ्यांना संघटनेच्या ताकदीवर पदे मिळाली. मी सुद्धा सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. मी कुठून मर्सिडिज देणार होतो. किमान बाळासाहेब ठाकरे यांच्याशी तरी इमान राखायला हवे होते. हे पाप तुम्हाला इथेच फेडायला लागणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५

# बुद्धीवर विश्वास ठेवणारा जगातला क्रांतिकारी शास्त्रज्ञ : महात्मा गौतम बुद्ध



तथागत गौतम बुद्धाएवढा विज्ञाननिष्ठ, विवेकनिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी महामानव दुसरा कुणीही झाला नाही. प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथात तथागथांच्या विचारसंपदेचा सविस्तर आढावा घेतला आहे..

तथागतांनी जगण्याचा आधार शोधणाऱ्या अगणित लोकांना विवेकशील स्वच्छ धम्म दिला. हा धम्म बुद्धाच्या करुणेतून जन्माला आला. सिद्धार्थ गौतमाने सुखी जीवनाचा त्याग करून दुःखाचे मूळ कारण शोधून काढले. जगात दुःख भरलेले आहे. त्यावर मात करता येते. आपलं स्वतःचं मौलिक जीवन सुखी करता येतं हेही ठामपणे सांगितलं. भोगलालसेत भरकटणारी माणसं स्वतःचं स्वतःचं आपलं अस्तित्व हरवून जगतात. अंधारमय जीवन जगतात. स्वयंप्रकाशी न होता परप्रकाशी होवून आयुष्यभर चाचपडतात. हा अनेकांना भेडसावणारा प्रश्न महात्मा बुध्दांनी सोप्या शब्दांत कथन केला. बुद्धविचार हा काळाच्या, विज्ञानाच्या कसोटीवर खरा उतरणारा दिव्य-विचार आहे. तथागत बुद्धाचं तत्त्वज्ञान स्वर्ग, मोक्ष आणि आत्मा यांना नकार देतं. बुध्दाच्या प्रखर बुद्धीप्रामाण्यामुळे लोकांची मोक्षाच्या गूढ, अगम्य, अदृष्य भ्रमातून मुक्तता झाली. "अत्त दीप भव! स्वतःच स्वतःचे मार्गदर्शक व्हा. स्वयंप्रकाशी व्हा!" हा महत्त्वाचा मूलमंत्र दिला. एका अर्थाने तथागत बुद्धाने अंधारात चाचपडणाऱ्या जगाला नितळ निळा प्रकाश दिला. विख्यात विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या बुद्ध चिंतन या ग्रंथात असं म्हटलंय की, "मानवी मुद्रा असलेल्या धम्माला दास्यमुक्त, शोषणमुक्त, दुःखमुक्त माणूस हवा आहे. 'एहि पास्सिको' या, पहा, अनुभव घ्या. स्वतःच स्वतःच्या मनाची दारे उघडा. बुद्धीला पटेल तरच स्वीकारा." असे प्रतिपादन करणारा जगातील एकमेव धर्म म्हणजे बुद्ध धम्म होय.

तथागत गौतम बुद्ध यांची जयंती भारतासह जगातील अनेक देशात साजरी केली जाते. त्यांच्या धम्माचेही अनेक देशात अस्तित्व निर्माण झाले. पण जेथे ते जन्मले त्या देशात काही काळानंतर बुद्ध धर्माचा प्रभाव कमी झाला. १९५६ साली बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची लाखो अनुयायांसह दीक्षा घेतल्यावर धम्माचे पुनरुज्जीवन झाले. गौतम बुद्ध यांना आयु. आ. ह. साळुंके, प्रा. भगवान भोईर इ. विचारवंत सर्वोत्तम भूमीपुत्र म्हणून त्यांचा गौरव करतात. या देशात अनेक प्रज्ञावान सुपुत्र जन्माला आले. त्यांनी आपल्या अंगभूत कर्तृत्वाने विविध क्षेत्रात भारत देशाचे नाव जगात वाढवले. त्या सर्वांमध्ये भगवान बृद्ध हेच सर्वोत्तम भूमीपुत्र ठरले. त्यांनी सबंध जगाला धम्म नावाची बुद्धिप्रामाण्यवादी अनमोल भेट दिली. त्यामुळे देशाचे नाव रोशन झाले. जेव्हा बुद्धाचा जन्म झाला तेव्हा धर्मकारणात-समाजकारणात सर्वत्र अंधार भरलेला होता. कर्मकांडाने समाज गांजलेला होता. यज्ञसंस्कृतीने सर्वत्र उच्छाद मांडलेला होता. यज्ञाच्या नावावर सर्वत्र अवैज्ञानिक प्रयोगांनी धुडगूस घातलेला होता. नैसर्गिक संकट आले की, करा यज्ञ ! सुख शांतीसाठी - करा यज्ञ ! लोकांना सुखासाठी खोटे आमिष दाखवून यज्ञ करायला भाग पाडले जात होते. हजारो लाखो रुपयांचा खर्च करायला लावण्यात बाध्य केले जात होते. पाप-पुण्य, देव-दैव, स्वर्ग-नरक, भूत-पिशाच्च यांची भीती दाखवली जात होती. अवतार संकल्पनेमुळे सारा समाज आंधळा झाला होता. मतिमंद बनला होता. देवशरणता माजल्याने माणसाचे अवमूल्यन झाले होते. माणूसपण संपवून टाकण्यात आले होते. महात्मा बुद्धाने माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा बहाल केली.

बुध्दाच्या समकालीनांनी आत्म्याविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. गतसमयी मी कोण होतो? मी काय होतो? मी कोणत्या अवस्थेतून कोणत्या अवस्थेत गेलो. मी भावी समयात कुठे असणार ? कुठल्या अवस्थेत असणार ? बुद्धांनी या प्रश्नांवर कपोलकल्पित, कल्पनाविलासाश्रित प्रश्न म्हणून शिक्का मारून त्यांना निकालात काढले. कल्पित अवैज्ञानिक सिद्धांताची त्यांनी घोर निंदा केली. बुद्धांच्या या विचारांना स्फोटक, क्रांतिकारी म्हटले गेले. म्हणून महात्मा बुद्ध सामाजिक क्षेत्रामध्ये आद्य क्रांतिकारक ठरतात. विश्वाची निर्मिती झाली यावर त्यांचा विश्वास नव्हता. विश्व उत्क्रांत झाले अशी त्यांची धारणा होती. कुठल्याही जातीच्या माणसाला संघात प्रवेश होता. संघात स्त्रियांनाही त्याकाळी प्रवेशास मज्जाव नव्हता. ही बाब बुद्धविचाराचे क्रांतिकारत्व सिद्ध करणारी आहे.

महात्मा गौतम बुद्धाने जगाला एक आगळावेगळा धम्म दिला म्हणून त्यांच्या विचारांची प्रशंसा केली गेली. शास्त्रज्ञांनी, आधुनिक विचारवंतांनीही त्यांच्या महानतेची मुक्त कंठाने प्रशंसा केली. आर. जे. जॅक्शन म्हणतात -"बौद्ध धम्माने मानवात प्रछन्न असलेल्या आंतर सामर्थ्याच्या शोधाकडे मानवाचे लक्ष वेधले." रेव्हरंड लेस्ली बोस्टन म्हणतात, "बौद्ध धम्माचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान हे सामर्थ्यशाली योगदान होय." प्रो. ईवाईट गोडार्ड म्हणतात, "या जगी जेवढे धर्मसंस्थापक होवून गेले त्यात बुद्ध हाच एकमेव थोर संस्थापक होता की, ज्याने मानवातील विद्यमान निहित शक्ती जाणली. ही निहित शक्ती माणसाला मुक्तिपथावर अग्रेसर करू शकते." बौध्द धम्म हा विद्येचे श्रेष्ठत्व आणि अविद्येचे हीनत्व लक्षात आणून देतो.

महात्मा बुद्धांचे तेजस्वी, क्रांतिदर्शी विचार विज्ञानाच्या कसोटीवर खरे उतरतात. त्यांनी जगातील माणसांची परमेश्वर, देव नावाच्या तुरुंगातून सुटका केली. या धम्मात देवाच्या न दिसणाऱ्या अस्तित्वाला स्थानच नाही. देव-पिशाच्च, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, मोक्ष अशा संकल्पनांना स्थानच नाही. तरीही काही वैदिक धर्मियांनी बुद्धाला अवतार नावाचा मुखवटा चढवण्याचा प्रयत्न केला. ही बाब पूर्णत: असत्य आहे. निराधार आहे. बुद्धाचं क्रांतिकारत्व त्यांच्या विचारात सामावलेलं होतं. ते स्वतःला माणूस म्हणवत. त्यांनी देवत्वाचा विरोध माणसाला माणूसपण बहाल केलं. चमत्कारांवर तर त्यांचा जराही विश्वास नव्हता. अवैज्ञानिक-काल्पनिक गोष्टींवर त्यांचा विश्वास नव्हता. त्यांनी यज्ञ संस्कृतीवर प्रखर हल्ला चढवला. तिचा कडाडून विरोध केला. त्यांनी हे धाडस करून या देशात महान क्रांती केली. बुध्द हे महान देशभक्त होते. महामानव होते. धम्म संस्थापक असूनही ते देव नव्हते. इतर कुठल्याही धर्माचे संस्थापक आपण माणूस आहोत, असे मानत नाहीत.

चित्त सर्व मानसिक प्रवृत्तीत प्रधान आहे. चित्तच प्रमुख आहे. चित्त साधना हे प्रथम साध्य आहे. चित्त हेच सर्व बऱ्यावाईटाचे स्त्रोत आहे, असे बुद्धाने ठामपणे प्रतिपादन केले. वाईट आणि चांगले ही चित्ताचीच निर्मिती असते. तृष्णा वाईट असते. तृष्णा हीच सर्व दुःखाचे कारण असते. तृष्णा म्हणजे तहान. माणसाला धनाची तहान असते. यशाची, कीर्तीची, प्रसिद्धीची तहान असते. ही तहान कधीच कमी होत नाही. जेवढी तहान जास्त तेवढे दुःख अधिक. तृष्णेतूनच दुःखाची, संकरांची निर्मिती होते. जो तृष्णेला जवळ फिरकू देत नाही, तो सुखी असतो. त्यांनी दु:खमुक्तीचे आठ प्रकार किंवा उपाय सांगितले. ते अष्टांगमार्ग म्हणून परिचित आहेत. ते म्हणजे सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक उपजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती, आणि अभ्यक समाधी होय. हिंदू धर्मात दुःख दूर करण्यासाठी देवपूजा, जप, अनुष्ठान, उपास, यज्ञ, नवस असे नाना उपाय सुचविले जातात. व्रतवैकल्य यज्ञ हा उपायही सांगितला जातो. स्त्रोत्र पठण करायला सांगतात. आतातर टेलिशॉपिंगमध्ये नजर सुरक्षा कवच, धन लक्ष्मी यंत्र, शनी रक्षक यंत्र असे अत्याधुनिक उपायही सुचवले जातात. त्यांची किंमत ही अव्वाच्या सव्वा असते. शोषणाला खतपाणी घालणारे हे उपाय आहेत. उलट बौद्ध धर्मात अशा अवैज्ञानिक उपायांना जराही थारा नाही. हिंदू धर्म डोळ्यांवर धर्मग्रंथाची पट्टी बांधायला सांगतो. बौद्ध धम्म डोळे उघडे ठेवून विचार करायचे आवाहन करतो. बुद्धांनी घोडा-गाय-बैल अशा प्राण्यांची आहुती देणारा यज्ञ विझवून टाकला. शंकराचार्यांनी तो पुन्हा पेटवला. मग बहुजनांच्या शोषणाला प्रोत्साहन देणारे कोण?

म. बुद्धाचे तत्त्वज्ञान, तर्कशुद्ध विचार, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्यता, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती या मूल्यांवर आधारलेले आहे. त्यात भोंगळपणा, दंभ-ढोंग सापडत नाही. बुद्ध हा जगातला पहिला बुद्धीवर विश्वास ठेवणारा शास्त्रज्ञ. त्यांचा धम्म म्हणजे बुद्धीचा धर्म. जे सदबुद्धीला पटेल त्याचा स्वीकार करा. जे पटत नाही त्याला नकार द्या. भारतीय राज्यघटनेचा डोलारा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती या पाच स्तंभावर उभा आहे. या अर्थाने बाबासाहेबांनी भारत बोद्धमय केला असे ठामपणे म्हणता येते. प्रज्ञावंत महापुरुष हे त्या राष्ट्राची वा व्यापक अर्थाने संपूर्ण जगाची विचार संपदा असतात. मौलिक ठेवा असतात. म्हणून बुद्धविचारांवर विसंबून जीवन सुखाने जगावे आणि बशीर बद्र यांच्या भाषेत तथागतांना विनंती करावी की,

***"उजाले अपनी यादों के हमारे साथ रहने दो***
***न जाने किस गली में जिंदगी की शाम हो जाये"***

शांती ही देणगी बुध्दानेच जगाला दिली. म.गांधींनी स्वातंत्र्य युद्धात तिचा महाशक्तीसारखा वापर केला. आज जगात सर्वत्र युद्धाची आग धुमसत आहे. कुठलाच देश सुरक्षित वाटत नाही. जगातील निर्दोष लोकांना युद्ध नकोच. त्यांना हवाय शांती प्रदान करणारा, करुणेचा सागर असलेला बुद्ध !

**डी. बी. जगत्पुरिया**
मो. ९८६०४८५३९८
'संगर', पाण्याच्या टाकीजवळ,
मीरानगर, पडेगांव,
औरंगाबाद - ४३१००२

## रोहिले बुद्रुक येथे घरकुलांचे मंजूर पत्र व पहिला हप्ता वितरणाचा कार्यक्रम संपन्न





**नाशिक** : जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात असलेल्या रोहिले बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १० लाख लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र व १० लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम - पुणे दुरस्त सहभाग म्हणून गृहमत्सोवाचा कार्यक्रम घेण्यात आला.

उपस्थित लाभार्थ्यांना प्रमाणपत्रचे वाटप करून त्यांचा सत्कार रोहिले बुद्रुक ग्रामपंचायत चे सरपंच ठकुबाई देविदास पवार, उपसरपंच सौ. सुनंदा मुक्ताराम बागुल, व ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेतील २०२४-२०२५ च्या लाभार्थ्यांना दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी शनिवारी दुपारी १३ वाजता गृहमंत्री महोदय, भारत सरकार एव मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांनी घरकुल लाभार्थ्यांसोबत ऑनलाईन संवाद या सत्रात कार्यक्रम पुणे येथे घेण्यात आला. त्या अनुषंगाने रोहिले बुद्रुक येथील एकूण ३१ पात्र लाभार्थ्यांची यादी चे नाम फलक लाभार्थ्यांना माहिती होण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाला लावण्यात आले होते.

येथील जितूप परिषद प्राथमिक शाळेत सदरचा कार्यक्रम पार पाडताना उपस्थित असलेल्या पात्र व मंजूर घरकुल लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे रोहिते बुद्रुक ग्रामपंचायतचे सरपंच ठकुबाई देविदास पवार, उपसरपंच सौ. सुनंदा मुक्ताराम बागुल, ग्रामपंचायत सदस्य सोपान दत्तात्रय गायके, ग्रामपंचायत सदस्य, सुरेश भास्कर बागुल व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते घरकुल मंजुरी पत्राचे व प्रथम हप्ता चे ऑनलाईन वितरण करण्यात आले.परंतु कुठल्याही प्रकारची ग्रामसभा घेण्यात आलेली नव्हती ग्रामसभा फक्त आणि फक्त घरकुल मंजुरी पत्राचे व प्रथम हप्ता ऑनलाइन वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सरपंच ठकुबाई देविदास पवार, सौ. सुनंदा मुक्ताराम बागुल, ग्रामपंचायत सदस्य सुरेश भास्कर बागुल, सोपान दत्तात्रय गायके, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची मुख्याध्यापक सूर्यवंशी सर, शिक्षक, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते मुक्ताराम बागुल, गावातील रवींद्र यादव बागुल, अनिल केशव बागुल, काशिनाथ वेडु चव्हाण, ग्रामपंचायत कर्मचारी अनिल संताराम अरबुज तसेच गावातील इतर ज्येष्ठ नागरिक व महिला आणि पात्र घरकुल लाभार्थी उपस्थित होते.

